सं.फौ.ख.क्र.: २४२/२०१५
श्रीराम वि. राकेश
नि.: १४

## तक्रारदाराकरीता साक्षीदार क्र. १ यांची जबानी

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

**<u>उलटतपास आरोपीतर्फे श्री. कुशवाह यांद्वारे</u>**:

मी तक्रारदार कंपनीचा कायदेशीर व्यवस्थापक आहे. सदरहु कंपनी रजिष्टर असल्याबाबतचे कोणतेही कागदपत्र मी अभिलेखात दाखल केलेले नाही. दिनांक २/०६/२००३ रोजी कंपनीने ठराव पास करुन कंपनीकरीता अधिकार धारक (POA) म्हणुन माझी नेमणुक करण्यात आली. हे म्हणणे बरोबर आहे की, तो ठराव अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, अभिलेखावर अधिकार पत्राची मुळ प्रत लावण्यात आली नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, अभिलेखावर अधिकार पत्राची साक्षांकित प्रत लावलेली नाही. हे म्हणणे बरोबर नाही की, मी अभिलेखावर बोर्ड ऑफ डायरेक्टर्सला मला आधिकार पत्र देण्याबाबतचे अधिकार असल्याबाबतचे कागदपत्र दाखल केलेले नाही. हे म्हणणे बरोबर नाही की, बोर्ड ऑफ डायरेक्टर्सला मला अधिकार पत्र देण्याबाबतचे कोणताही अधिकार नव्हता व त्यामुळे मी त्याबाबतचे दस्त अभिलेखात दाखल केलेले नाही. अधिकार पत्र दिनांक १८/०१/२००७ रोजी मुंबई येथे नोटरी करण्यात आले होते. आज मी अधिकार पत्राची मुळ प्रत सोबत आणलेली नाही. हे म्हणणे बरोबर नाही की मला आरोपी राकेश पिल्ले याचेविरुद्ध

सदरची केस दाखल करण्याबाबत अधिकार पत्र मिळालेले नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, अधिकार पत्रामध्ये असे कुठेही नमुद नाही की मला आरोपी राकेश पिल्लेच्या विरुद्ध सदरची केस चालविण्याचे अधिकार आहे. हे म्हणणे बरोबर आहे की, अधिकार पत्रामध्ये वादातीत धनादेशाची रक्कम व धनादेश क्रमांक नमुद नाही. हे म्हणणे बरोबर नाही की, बोर्ड ऑफ डायरेक्टरने असे कुठलाही ठराव आरोपी राकेश पिल्लेविरुंद्ध पास केलेला नव्हता. हे म्हणणे बरोबर नाही की, चिटफंड/भिसी हे सरकारने अवैध घोषित केलेले आहे. चिटफंड/भिसी हे वैध असल्याबाबतचे मी कुठलेही दस्त अभिलेखात दाखल केले नाही.

भिसी ही रक्कम रु. ५ लाखाची असुन १०,००० रुपये प्रती महिना अशी होती. सदर चिटफंड/भिसी ही केव्हा चालु झाली व कधी संपणार आहे हे मी सांगु शकत नाही. आरोपी राकेश पिल्ले याने कोणत्या तारखेस हप्ता देण्यास सुरुवात केली व कोणत्या तारखेपर्यंत हप्ते दिले याबाबतचे कागदपत्र मी न्यायालयात पुढील पेशी तारखेपर्यंत दाखल करु शकतो.

हे म्हणणे बरोबर आहे की, चिटफंड/भिसीचा १० हजार रुपये महिणा हप्त्याने देण्याचे ठरले होते. हे म्हणणे बरोबर आहे की, चिटफंड/भिसीच्या अटींमध्ये असे कुठेही ठरले नव्हते की अगाउ (advance) मध्ये धनादेश दयावे लागतील. मी अभिलेखावर दाखल धनादेश सोडुन इतर कुठलेही धनादेश आरोपीकडुन घेतलेले नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, ज्या ग्राहकाने त्याचे मासिक हप्ता दिला नाही त्याला डिफाल्टर म्हणुन घ ोषित केले जाते. आरोपी राकेश पिल्ले यांस डिफाल्टर म्हणुन

जाहिर करण्यात आले आहे परंतु कोणत्या दिवशी केले हे मला सांगता येणार नाही. आरोपी राकेश पिल्ले याने पन्नास पैकी १५ हप्ते भरले आहेत. हे म्हणणे बरोबर नाही की, याचा अर्थ असा होतो की आरोपीचे सध्या आमच्या कडे दिड लाख रुपये जमा आहेत. साक्षीदार सांगतो की आरोपीने हप्त्यांप्रमाणे रक्कम भरलेली नाही. आरोपीला त्याने पैसे न दिल्यामुळे कंपनीतर्फे नोटीस दिला होता. आरोपीला त्याने पंधरा हप्ते भरल्यानंतर पुढील हप्ता भरण्यास जेव्हा डिफॉल्ट केला तेव्हा त्याला नोटीस पाठविण्यात आली होती. आता मला नि.१९ वरिल नोटीस दाखविण्यात आली. ती तिच नोटीस आहे. याव्यतिरिक्तही आरोपीला नोटीसेस पाठविण्यात आल्या पंरतु त्या अभिलेखावर दाखल नाही.

दिनांक १७/०७/२०१४ रोजी काय झाले ते मला आठवत नाही. हे म्हणणे बरोबर आहे की, चिटफंड/भिसीच्या बोलीच्या वेळी मी हजर राहतो. हे म्हणणे बरोबर आहे की, मी कायदेशील विभागाचे काम करतो. साक्षीदार सांगतो की मी कायदेशीर विभागाचे, लिलाव, डॉक्युमेंटेशन, वसुलीचेही काम करतो. मी बोलीचेही कागदपत्र तयार करतो. बीटमध्ये बोलीच्या वेळी कोण हजर होतात त्याचेही कागदपत्र मी तयार करतो. दिनांक १७/०७/२०१४ रोजी किती लोकांनी बिटमध्ये बोली लावली होती त्याचे नाव मला आठवत नाही व त्याबाबतचे अभिलेखावर कागदपत्रही दाखल नाही. ते दाखल न करण्यामागचे मला कारण सांगता येणार नाही. दिनांक १७/०७/२०१४ रोजी

कितीची बोली लागली हे मला सांगता येणार नाही. अंदाजे जास्तीत जास्त १,५८,०००/- रकमेची बोली लागली होती. रक्कम रु. १,५८,०००/- ही पाच लाखाच्या बीटची बोली होती. त्यावेळी रक्कम रु. १,५८,०००/- चा आरोपीकडुन धनादेश घेतला नव्हता. प्राईस मनी ३,४२,००० इतकी होती. मी त्याचाही धनादेश घेतला नव्हता. आता साक्षीदाराला नि.क्र.१८ दाखविण्यात आले. त्यात नमुद मजकुर व सही मधील शाही वेग-वेगळी नसल्याचे त्याने सांगितले. हे म्हणणे बरोबर नाही की, धनादेशावरिल रक्कम व त्यावर लिहिलेले श्रीराम चिटस हे वेगळया हस्ताक्षरात व शाहीने लिहिलेले आहे. सदरचा चेक हा मला अंदाजे सन २०१५ मध्ये मिळाला. मी तो चेक कोणत्या दिवशी बॅकेत टाकला, कधी नादार झाला व नोटीस केव्हा पाठविली याची नक्की तारिख सांगु शकत नाही.

कोर्टाची वेळी संपल्यामुळे उलटतपास पुढील
तारखेपर्यंत तहकुब.

फेरतपास: नाही.

माझे समक्ष

वा.दा.ब.अ.क.के

न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग
कामठी
दि. १७/०९/२०१७.

(श्रीमती. एस.ए.पाटील)
न्यायदंडाधिकारी प्र. वर्ग,
न्यायालय क्र.२, कामठी